# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 11/05/2020 (सोमवार)

(सकाळ)

### अनोळखी मृतदेहाचा शोध लावुन खुन करणाऱ्या अज्ञात आरोपीस जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामिण यांना यश

पोलीस स्टेशन सावनेर येथे दिनांक 10.05.2020 चे सकाळी माहीती मिळाली की, नागपुर पांढुर्णा महामार्गा लगत असणाऱ्या सुनिल सावरकर यांचे ऊसाचे शेतात एका अनोळखी अंदाजे 25 वर्षाच्या इसमाचे प्रेत बेवारस पडलेले असुन त्याचे डोक्याला व चेहऱ्याला मार लागलेला आहे. अशी माहीती मिळताच घटनास्थळावर पोलीस रवाना झाले. प्रकरण गंभीर असल्यामुळे मा. पोलीस अधीक्षक सा., नागपुर ग्रामिण यांचे आदेशाने पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामिण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा यांचे वेगवेगळे दोन पथक तयार करून घटनास्थळी रवाना केले. सदर घटने बाबत पोलीस स्टेशन सावनेर येथे अप.क्र. 257/20 कलम 302,201 भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणाचा समांतर तपास करीत असतांना मृतदेहाची प्रथमदर्शी पाहणी केली असता मृतकाचे डोक्यात दगड घालुन कुणीतरी अज्ञात इसमाने त्याचा खुन केलेला आहे हे दिसुन येत होते. मृतदेह हे अनोळखी असल्याने सध्या कोव्हीड–19 मुळे आपआपले गावी जाणारे परप्रांतीय लोकांप्रमाणे सदर मृत इसम सुध्दा त्यांचे पैकीच परप्रांतीय असल्याचे शक्यता नाकारता येत नव्हती. त्या दिशेने सुध्दा तपासाची चक्रे फिरविण्यात आली होती. सदर अनोळखी मृतदेहाचे पाहणी केली असता त्याची ओळख पटुन येत नसल्याने सदर मृतदेहाचे छायाचित्र सोशल मिडीया ग्रुप वर प्रसारीत करून त्याबाबत माहीती मिळविली असता मृतदेह हे उद्देश प्रेमसागर बागडे, वय 22 वर्ष, रा. वाघोडा, वेकोली सावनेर याचे असुन तो दि. 09/05/2020 चे दुपार पासुनच सेंट्रींग चे कामावर जातो असे सांगुन घरून निघुन गेलेला असल्याचे कळाले. मृतक बाबत अधिकची माहीती घेवुन तो दि. 09/05/2020 पासुन कुठे कुठे व कोणा सोबत गेलेला होता याबाबत माहीती घेतली असता मृतक हा त्याचे कामाशी निगडीत असलेल्या एका व्यवसायीक मित्रा सोबत दि. 09/05/2020 रोजी चे दुपारी व सायंकाळ चे सुमारास गेलेला होता अशी माहीती मिळाली. या माहीती वरून इसम नामे सारंग वासुदेव अलासपुरे, वय 22 वर्ष, रा. हॉटमेंट कॉलनी, वेकोली, सावनेर यास ताब्यात घेवुन त्यास त्याचे दि. 09/05/2020 रोजी चे सकाळ पासुनचे त्याचे दिनक्रमा बाबत विचारपुस केली असता त्याचे सांगणेवरून तो गोंधळुन जावुन उत्तर देत काही तरी लपवित असल्याचे लक्षात आले. त्यावरून त्यास अधिक विश्वासात घेवुन मृतका बाबत विचारपुस केली असता त्याने मान्य केले की, तो दि. 09/05/2020 रोजी चे दुपार पासुनच त्याचे

मोटर सायकलने मृतक सोबत फिरत होता व रात्री घटनास्थळी बसुन असतांना अचानक दोघां मध्ये भांडण झाली. भांडणाचे रूपांतर मारामारीत झाले व त्यातच सारंग अलासपुरे याने मृतक उद्देश बागडे याचे डोक्यात दगड मारून त्याचा खुन केला व मृतदेह घटनास्थळाला लागुनच असलेल्या ऊसाचे शेतात त्याचा मृतदेह फेकुन पळुन गेला व आपल्याला कोणी पाहले जरी असेल तरी आपण कोणास ओळखु येवुन नये याकरीता दि. 10/05/2020 चे सकाळीच नाव्हया कडुन जावुन त्याने आपले टक्कल सुध्दा करवुन घेतले. सदरचा खुन हा सारंग अलासपुरे याने तात्कालिन झालेल्या भांडण व मारामारी मुळे केल्याचे निष्पन्न झाल्याने स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामिण यांनी सायबर सेल यांचे मदतीने अवघ्या 12 तासात सदर अनोळखी मृतदेहाचा शोध घेवुन त्याचे अज्ञात मारेकऱ्याचा शोध लावुन आरोपीस पुढील कार्यवाही करीता पोलीस स्टेशन सावनेर यांचे ताब्यात दिले.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक मोनिका राऊत ना. ग्रा. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिटट्ावार, सपोनि जितेंद्र वैरागडे, पोउपनि नरेंद्र गौरखेडे, पोउपनि जावेद शेख, सफौ बाबा केचे, साहेबराव बहाले, पोहवा चंद्रशेखर घडेकर, नाना राऊत, राजेंद्र सनोडीया, पोना दिनेश अदापुरे, पोशि रोहन डाखोरे, अमोल वाघ, आशु लांजेवार व सायबर सेल चे सोनु चटप, सतिष राठोड, मपोशि स्नेहा यांनी पार पाडली.



## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 14 कि. मी अंतरावर आझाद चौक धानला येथे दिनांक 10/05/2020 चे 09.00 वा. पुर्वी फिर्यादीचा भाऊ नामे– केशव याचे सोबत आरोपी नामे– 1) अंबर पांडुरंग तांबुळकर, वय 30 वर्ष, रा. धानला याच्या सोबत भांडण करीत असतांना फिर्यादी तेथे उभे असतांना आरोपी क्र. 1 ने तेथे थांबवुन चाकु काढन फिर्यादीच्या पोटात मारल्याने फिर्यादीने तो हुकवला असता आरोपीने आरोपी क्र. 1., 2) अरूण पांडुरंग तांदुळकर, वय 40 वर्ष, व 3) कैलास पांडुरंग तांबुळकर, वय 36 वर्ष, सर्व रा. धानला यांनी संगनमत करून फिर्यादीस तेथे शेतातील उसाचे पिकात आधुन टाकला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुनिल बापुराव सावरकर, वय 35 वर्ष, रा. मडकी चौक मुरलीधर मंदीर सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 307, 341, 324, 323, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. हारगुडे 9665648485 हे करीत आहे.

# जबरी संभोग

पो.स्टे. कन्हान :– दिनांक 09/05/2020 चे 12.00 वा. ते दिनांक 10/05/2020 चे 16.00 वा. सुमारास फिर्यादी यांची 7 वर्षीय मुलगी/पिडीता हि आरोपी नामे– दर्शन तातोबाजी काळे, रा. पिराया, वय 31 वर्ष, रा. पिराया, ता. उमरेड याच्या दुकानात शॅम्पुची पुडी घेण्यासाठी गेली होती. दरम्यान आरोपीने पीडित अल्पवयीन मुलीस त्याच्या दुकानात बोलावुन तिला चॉकलेटचे आमीष दाखवुन पिडीतेसोबत लैंगिक अत्याचार केले. तसेच गुन्हयातील साक्षीदार असलेली अल्पवयीन 8 वर्षीय पीडिता हीचे सोबत देखील आरोपीने असाच प्रकार केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 376 (2)(ज)(न), 376(एबी) भादंवि., सहकलम 3 चे उल्लंघन 4 व कलम 5(ल)(म) चे उल्लंघन 6 प्रमाणे कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि पाटील 8419953444 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर